International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 15 January – February - 2026

# अहमदनगर जिल्ह्यातील एम.आय.डी.सी. क्षेत्रातील तालुकानिहाय प्रकल्प व रोजगार यांचे तुलनात्मक विश्लेषण (संदर्भ वर्ष: 2021–22)

**गुजर उमेश भाऊसाहेब[१], प्रा. डॉ. संतोष मारूतीराव वाघमारे[२]**

[१]*संशोधक विद्यार्थी*

[२]*संशोधक मार्गदर्शक*

*न्यू आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज अहमदनगर,(स्वायत्त) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे*

***Corresponding Author – गुजर उमेश भाऊसाहेब***

**DOI - 10.5281/zenodo.18833600**

**सारांश:**

*प्रस्तुत संशोधन लेखात अहमदनगर जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) क्षेत्रातील तालुकानिहाय प्रकल्प व रोजगार यांचे विश्लेषण करुन तालुकानिहाय तुलनात्मक अभ्यास करण्यात आलेला आहे. या अभ्यासाचा मुख्य उद्देश हा अहमदनगर जिल्ह्यातील तालुकानिहाय एम.आय.डी.सी. प्रकल्पांची संख्या आणि निर्माण झालेल्या रोजगार यामधील तुलनात्मक संबंध तपासणे हा आहे. जिल्ह्यात केवळ पाच (अहमदनगर, पारनेर, श्रीरामपूर, नेवासा, राहुरी) तालुक्यांमध्ये एम.आय.डी.सी. कार्यरत असून, औद्योगिक विकास व रोजगार निर्मितीत लक्षणीय फरक आढळून येतो. 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2022, जिल्हा- अहमदनगर अहवाल' या दुय्यम माहिती स्त्रोतांवर आधारित हा अभ्यास जिल्ह्यातील असमतोल औद्योगिक विकास दर्शवून धोरणात्मक शिफारसी सुचवतो, जेणेकरून जिल्ह्यात समतोल औद्योगिक विकास साधता येईल.*

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) ही महाराष्ट्र सरकारची एक महत्त्वपूर्ण संस्था असून ती राज्यातील उद्योग वाढीसाठी औद्योगिक क्षेत्रांचा विकास करते. औद्योगिक क्षेत्राच्या विकासामधून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती केली जाते. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये एम.आय.डी.सी. क्षेत्र स्थापन झाले असून मोठ्या प्रमाणामध्ये गुंतवणूक आकर्षित करण्यात आली आहे. याचप्रमाणे अहमदनगर जिल्ह्यातही विविध तालुक्यांमध्ये एम.आय.डी.सी.च्या माध्यमातून औद्योगिक प्रकल्प उभे राहिले आहेत. मुख्यत्वे अहमदनगर जिल्ह्यामध्ये अहमदनगर पारनेर, श्रीरामपूर, नेवासा व राहुरी या तालुक्यांमध्ये एम.आय.डी.सी. प्रकल्पांची स्थापना झालेली दिसून येते.

प्रस्तुत संशोधनामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील एम.आय.डी.सी.क्षेत्रातील तालुका निहाय प्रकल्प व रोजगार यांचे तुलनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे. हे विश्लेषण जिल्हा सामाजिक व आर्थिक समलोचन 2022, जिल्हा अहमदनगर या शासकीय अहवालातील आकडेवारीचा आधार घेऊन करण्यात आले आहे. या अभ्यासात तालुका निहाय प्रकल्पांची संख्या व त्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या रोजगारांची संख्या यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

अहमदनगर जिल्ह्यामध्ये एम.आय.डी.सी. क्षेत्रातील औद्योगिक विकासामध्ये असमतोल दिसून येतो जिल्ह्यातील

अहमदनगर ,पारनेर व श्रीरामपूर तालुक्यांमध्ये प्रकल्पसंख्या व त्या अनुषंगाने निर्माण होणारी रोजगार संख्या अधिक आहे. तर नेवासे व राहुरी या तालुक्यांमध्ये प्रकल्पसंख्या व रोजगार संख्या अतिशय अल्प असलेली दिसून येते. ही औद्योगिक विषमता का निर्माण झाली ? , तसेच या असमतोलाला दूर करण्यासाठी कोणते उपाययोजना करणे आवश्यक आहे ? , प्रकल्पसंख्या व रोजगार संख्या यामध्ये असणारा परस्पर संबंध या घटकांचा शोध घेणे आवश्यक ठरते.

या अभ्यासाचा मुख्य उद्देश हा जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये एम.आय.डी.सी. प्रकल्प व रोजगार संख्येमध्ये असणाऱ्या असमतोलाचे विश्लेषण करणे प्रकल्पसंख्या व रोजगार संख्येतील परस्परसंबंध तपासणे व असमतोलाची कारणे शोधून त्यावर उपाययोजना सुचवणे हा आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1. अहमदनगर जिल्ह्यातील तालुकानिहाय एम.आय.डी.सी. प्रकल्पांची संख्या अभ्यासणे.
2. तालुकानिहाय एम.आय.डी.सी. क्षेत्रातील रोजगाराचे विश्लेषण करणे.
3. प्रकल्प व रोजगार यांची तालुकानिहाय तुलना करणे.
4. तालुकानिहाय एम.आय.डी.सी. प्रकल्प व रोजगार यातील फरकांचे कारण शोधून उपाय सुचवणे.

**गृहीतके:**

1. एम.आय.डी.सी. प्रकल्पांची संख्या आणि रोजगारामध्ये सकारात्मक संबंध आहे.
2. एम.आय.डी.सी. प्रकल्पांची संख्या तालुकानिहाय लक्षणीय प्रमाणात बदलते.
3. प्रकल्प संख्येत वाढ झाल्यास रोजगारातही वाढ होते.

**संशोधन पद्धती:**

**तथ्य संकलन :**

हा अभ्यास पूर्णतः दुय्यम माहितीवर आधारित आहे. 'जिल्हा सामाजिक आणि आर्थिक समालोचन अहवाल 2022 जिल्हा- अहमदनगर' या अहवालातील माहितीचा उपयोग करून विश्लेषण करण्यात आले आहे. वर्णनात्मक विश्लेषण पद्धतीचा वापर करून प्रकल्प आणि रोजगार यामधील संबंध मांडण्यात आला आहे. आकडेवारीचा उपयोग करून तुलना व विश्लेषण करण्यात आले आहे.

**तथ्य विश्लेषण:**

**1) वर्णनात्मक सांख्यिकीय विश्लेषण:**

प्रस्तुत संशोधनामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील एमआयडीसी मधील तालुका निहाय 2021-22 या वर्षातील प्रकल्पसंख्या व रोजगार संख्या या सांख्यिकीय माहितीचे संकलन करून वर्णनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे.

**2) तुलनात्मक विश्लेषण:**

तालुका निहाय एम.आय.डी.सी. मधील प्रकल्पसंख्या व रोजगार संख्या ही पाय चार्ट या आलेखाच्या सहाय्याने तुलनात्मक रित्या दर्शवण्यात आली आहे.

**3) सांख्यिकीय साधने:**

तथ्य विश्लेषणासाठी आणि सांख्यिकीय गणनासाठी टक्केवारी या गणितीय साधनांचा वापर करण्यात आला आहे.


**मर्यादा:**

प्रस्तुत संशोधन हे पूर्णपणे दुय्यम स्रोतावर अवलंबून असून सदर संशोधनामध्ये केवळ संदर्भ वर्ष 2021- 22 या वर्षातील माहितीचाच वापर करण्यात आला आहे.


**तक्ता क्र 1. अहमदनगर जिल्ह्यातील तालुकानिहाय एम.आय.डी.सी. प्रकल्पातील प्रकल्पसंख्या व रोजगार संख्या यांचा आढावा. (संदर्भ वर्ष 2021)**

| अ.क्र | तालुका | प्रकल्पांची संख्या | प्रकल्पांची संख्या (टक्केवारी मध्ये) | रोजगार संख्या (लाखात) | रोजगार संख्या (टक्केवारी मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | अहमदनगर | 1193 | 68.38 % | 1.1154 | 89.86 % |
| 2. | पारनेर | 393 | 22.53 % | 0.0797 | 6.42% |
| 3. | श्रीरामपूर | 127 | 7.28 % | 0.0420 | 3.38% |
| 4. | नेवासा | 23 | 1.32 % | 0.0028 | 0.23 % |
| 5. | राहुरी | 8 | 0.46 % | 0.0010 | 0.08% |
| एकूण | | 1744 | 100% | 1.2409 लाख | 100% |

(संदर्भ- जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2022, जिल्हा- अहमदनगर, तक्ता क्र. ६.१,पृष्ट क्र. 121)




(आधार तक्ता क्र.1)




(आधार तक्ता क्र.2)

तक्ता क्र. 1 व आलेख क्र. 1 व 2 नुसार 2021- 22 या वर्षातील अहमदनगर जिल्ह्यातील तालुकानिहाय एम.आय.डी.सी. मधील प्रकल्पसंख्या व रोजगार संख्या यांचा आढावा पुढील प्रमाणे घेतला आहे

**अहमदनगर:**

अहमदनगर तालुक्यातील एम.आय.डी.सी. मध्ये एकूण 1193 प्रकल्प असून ही संख्या जिल्ह्यातील एकूण प्रकल्पांपैकी 67.14% इतकी आहे. या प्रकल्पांमधून सुमारे 1.1154 लाख लोकांना रोजगार मिळत असून, ही संख्या जिल्ह्यातील एकूण रोजगाराच्या 89.86% इतकी आहे, जी सर्वाधिक आहे.

**पारनेर:**

प्रकल्पसंख्या व रोजगाराच्या संख्येनुसार दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या पारनेर तालुक्यात एम.आय.डी.सी. चे एकूण 393 प्रकल्प असून, हे जिल्ह्यातील एकूण प्रकल्पांपैकी 22.53% इतके आहेत. या प्रकल्पांमधून निर्माण होणारी रोजगारसंख्या 0.0797 लाख असून, हे जिल्ह्यातील एकूण रोजगाराच्या 6.42% इतके आहे.

**श्रीरामपूर:**

श्रीरामपूर तालुक्यातील एम.आय.डी.सी. मध्ये

एकूण 127 प्रकल्प असून, हे जिल्ह्यातील एकूण प्रकल्पांपैकी 7.28% इतके आहेत. या प्रकल्पांमधून निर्माण होणारी रोजगारसंख्या 0.0420 लाख असून, हे जिल्ह्यातील एकूण रोजगाराच्या 3.38% इतके आहे.

**नेवासा आणि राहुरी:**

जिल्ह्यातील एम.आय.डी.सी. मधील प्रकल्पसंख्या व रोजगार संख्येच्या तुलनेत नेवासा व राहुरी तालुके जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीत सर्वात मागे आहेत. नेवासा तालुक्यातील केवळ 23 प्रकल्प हे जिल्ह्यातील एकूण प्रकल्पांपैकी 1.31% आहेत, तर राहुरी तालुक्यातील 8 प्रकल्प हे केवळ 0.46% एवढे आहेत. रोजगाराच्या दृष्टीने पाहता, नेवासा तालुक्यात फक्त 0.0028 लाख म्हणजेच एकूण रोजगाराच्या 0.23% रोजगार उपलब्ध झाला आहे, तर राहुरीत केवळ 0.0010 लाख म्हणजेच 0.08% रोजगार निर्माण झाला आहे. हे आकडे स्पष्ट दर्शवतात की या तालुक्यांमध्ये औद्योगिक प्रकल्पांचा व रोजगारनिर्मितीचा अभाव आहे.

**निष्कर्ष:**

वरील आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की अहमदनगर जिल्ह्यातील तालुका-निहाय एम.आय.डी.सी. प्रकल्पसंख्या व रोजगार प्रवृत्तीत स्पष्ट भिन्नता आढळते.

तालुकानिहाय विचार करता, अहमदनगर तालुका औद्योगिक दृष्टिकोनातून सर्वाधिक विकसित असल्याचे दिसून येते. जिल्ह्यातील सर्वाधिक एम.आय.डी.सी. प्रकल्पसंख्या व त्यातून निर्माण होणारी सर्वाधिक रोजगारसंख्या या तालुक्यात आहे. जिल्हा मुख्यालय असलेल्या या भागात मोठे व मध्यम उद्योग स्थापन झाल्यामुळे रोजगार निर्मितीत लक्षणीय वाढ झाली आहे.

पारनेर तालुक्यात प्रकल्पांची संख्या चांगली असली तरी रोजगारसंख्या तुलनेने खूपच कमी आहे. याचे कारण म्हणजे या भागात लघु व मध्यम स्वरूपाचे उद्योग प्रामुख्याने स्थापन झाले असून त्यामधून तुलनेने कमी रोजगार निर्मिती होते.

श्रीरामपूर तालुक्यातील उद्योगसंख्या अहमदनगर व पारनेरच्या तुलनेत कमी असल्यामुळे तेथेही रोजगार निर्मिती मर्यादित आहे.

नेवासे व राहुरी या तालुक्यांमध्ये एम.आय.डी.सी. प्रकल्पसंख्या अत्यल्प असल्यामुळे रोजगारसंख्याही खूपच कमी आहे.

**या विश्लेषणावरून पुढील गोष्टी स्पष्ट होतात**

1. ज्या तालुक्यांमध्ये प्रकल्पसंख्या जास्त आहे, त्या तालुक्यांमध्ये रोजगारसंख्याही जास्त आहे. यावरून "एम.आय.डी.सी. प्रकल्पांची संख्या वाढल्यास रोजगारही वाढतो" हे संशोधनाचे पहिले गृहीत सत्य ठरते.
2. तालुका-निहाय प्रकल्पसंख्येत लक्षणीय फरक दिसून येतो, त्यामुळे तालुक्यानुसार एम.आय.डी.सी. विकासात असमतोल आहे हे दुसरे गृहीतही योग्य ठरते.
3. प्रकल्पसंख्या व रोजगार यामध्ये सकारात्मक संबंध आहे. प्रकल्पांची वाढ ही रोजगार निर्मितीमध्ये थेट प्रभाव टाकते, हे निरीक्षणदेखील यावरून सिद्ध होते.

**तालुकानिहाय एम.आय.डी.सी. प्रकल्प व रोजगार यातील फरकाची कारणे पुढील प्रमाणे सांगता येतील**

**पायाभूत सुविधांचा अभाव:** उद्योगांच्या विकासासाठी पायाभूत सुविधा जसे की वीज, पाणीपुरवठा, रस्ते, सांडपाणी व्यवस्थापन, औद्योगिक भूखंड इत्यादी घटक अत्यंत आवश्यक असतात. काही तालुक्यांमध्ये या सुविधा अत्यल्प असल्यामुळे उद्योजक त्या भागात गुंतवणूक करण्यास उत्सुक

नसतात. परिणामी त्या ठिकाणी प्रकल्पांची व रोजगाराची संख्या कमी राहते.

**गुंतवणूक आकर्षित करणाऱ्या धोरणांची कमतरता:** उद्योगांसाठी विशेष सवलती, करसवलती, सबसिडी, सुलभ परवाने, तसेच सिंगल विंडो क्लिअरन्स सारख्या धोरणांची अंमलबजावणी काही तालुक्यांमध्ये प्रभावीपणे होत नाही. त्यामुळे गुंतवणूकदार अन्य तालुक्यांना प्राधान्य देतात. नेवासे किंवा राहुरीसारख्या तालुक्यांमध्ये ही धोरणात्मक मर्यादा अधिक दिसून येते.

**वाहतूक व दळणवळण यामध्ये अडचणी:** औद्योगिक विकासासाठी दळणवळणाची सोय महत्त्वाची असते. मुख्य राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे जाळे, किंवा प्रमुख बाजारपेठांशी संपर्क नसणे ही एक मोठी अडचण आहे. जे तालुके वाहतूक सुविधांपासून वंचित आहेत, तेथे उद्योगांना कच्चा माल आणणे आणि तयार माल पोहोचवणे कठीण जाते. परिणामी, उद्योग स्थापन करण्याची इच्छा कमी होते.

**कुशल मनुष्यबळाची कमतरता:** उद्योगांना सक्षम, प्रशिक्षित व अनुभव असलेले कामगार आवश्यक असतात. काही तालुक्यांमध्ये शैक्षणिक व तांत्रिक शिक्षण संस्थांची कमतरता असल्यामुळे तेथे कुशल मनुष्यबळ उपलब्ध होत नाही. त्यामुळे उद्योजक अशा भागांपासून दूर राहतात. हे कारण त्या ठिकाणी रोजगाराची संधी निर्माण न होण्यामागे असलेले दिसून येते.

**उद्योजकतेविषयी जागरुकतेचा अभाव:** शासनाच्या विविध योजना, एमआयडीसी संदर्भातील माहिती, स्टार्टअप सल्लागार सेवा यांचा लाभ घेण्याबाबत जागरूकतेचा अभाव असल्यामुळे स्थानिक उद्योजक निर्माण होत नाहीत आणि उद्योग विस्ताराच्या संधी गमावल्या जातात.

**तालुकानिहाय एम.आय.डी.सी. प्रकल्प व रोजगार यातील असमतोल दूर करण्याच्या उपाय योजना पुढील प्रमाणे सांगता येतील**

1. मागास तालुक्यांमध्ये पायाभूत सुविधा वाढवाव्यात.
2. एम.आय.डी.सी. विस्तारासाठी खास प्रोत्साहन योजना आखाव्यात.
3. स्थानिक युवकांसाठी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र स्थापन करावे.
4. सार्वजनिक-खाजगी भागीदारी मॉडेलद्वारे गुंतवणूक वाढवावी.
5. तालुकानिहाय उद्योग विकास धोरण तयार करणे.
6. नवउद्योग व स्टार्टअपसाठी वित्तीय व जागा अनुदान सुविधा द्याव्यात.

**संदर्भ:**

१) जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन (2022), जिल्हा- अहमदनगर, जिल्हा साख्यिकी कार्यालय, अर्थ व साख्यिकी संचालनालय, (नियोजन विभाग) महाराष्ट्र शासन.

२) आगलावे प्रदीप,“सामाजिक संशोधन,पध्दतीशास्त्र व तंत्रे”, श्री साईनाथ प्रकाशन 1, भगवाघर कॉम्प्लेक्स, धरमपेठ, नागपूर.

3) https://www.midcindia.org/